म. सं. कौ. हिं. का. अर्ज क्र.09/2025
**CNRNo.MHBU**170003842025
भाग्यश्री+1 विरुध्द सुरेश+3

## निशाणी क्रमांक.3 वरील आदेश
## (दि.24.03.2026)

**01.** अर्जदार क्र.1 हिने प्रस्तुत चा अर्ज कलम 23 कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005 प्रमाणे तिच्या स्वतः साठी आणि तिची मुलगी अर्जदार क्र.2 साठी, गैरअर्जदार क्र.1 तिचा पती आणि गैर अर्जदार क्र.2 ते 4 तिचे सासरे, सासु व दीर अनुक्रमे, यांच्या विरुद्ध तिला आणि तिची अज्ञान मुलगी (अर्जदार क्र.2) यांना गैरअर्जदारांकडून अंतरिम पोटगी मिळावी यासाठी दाखल केलेला आहे.

**02.** गैरअर्जदारांनी यांनी निशाणी क्र.12 वर त्यांचे म्हणणे दाखल करुन मूळ अर्जास व या अर्जास आक्षेप नोंदविलेला आहे. त्याच बरोबर गैर अर्जदार यांनी निशाणी क्र.26 वर लेखी युक्तिवादाचे मुद्दे सुद्धा दाखल केले आहेत. गैरअर्जदार क्र.1 चे उत्पन्न आणि खर्चाचे विवरणपत्र निशाणी क्र.17 वर आहे. गैरअर्जदार यांनी त्यांच्या म्हणण्याच्या च्या पुष्ट्यर्थ काही कागदपत्र सुद्धा दाखल केले आहेत.

**03.** अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणणे वाचले. अर्जदार व गैरअर्जदार यांनी दाखल केलेले कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार व गैरअर्जदार यांचे उत्पन्न आणि खर्चाचे विवरणपत्राचे अवलोकन केले. अर्जदारांचे विद्वान विधीज्ञ श्री. दि. पी. मापारी आणि गैरअर्जदारांचे विद्वान विधीज्ञ श्री. जि. जे. निकस यांचा युक्तिवाद ऐकला.

**04.** अर्जदार क्र.1 हिचे असे म्हणणे आहे की, तिचे गैरअर्जदार क्र.1 सोबत दिनांक 06.05.2019 रोजी मौजे खटकेश्वर महाराज संस्थान, ब्राह्मण चिकणा, ता. लोणार, जि. बुलढाणा येथे लग्न झाले. सदर लग्न संबंधातुन अर्जदार क्र.1 हीला एक मुलगी (अर्जदार क्र. 2) झाली.

**05.** लग्नानंतर अर्जदार हिला गैरअर्जदारांनी सुरुवातीचे 2 वर्षे चांगले नांदविले. त्यानंतर गैरअर्जदारांनी तिला मुलगीच झाली म्हणून आणि अन्य छोट्या–छोट्या कारणावरून मारहाण करण्यास आणि अश्लील भाषेत शिवीगाळ करण्यास सुरवात केली. गैरअर्जदार तिला लाथा बुक्याने मारहाण करीत असत. गैरअर्जदार क्र.2 ते 4 गैरअर्जदार क्र.1 ला चिथावणी देत असत आणि गैरअर्जदार क्र.1 अर्जदार क्र.1 हिला मारहाण करीत असे. गैरअर्जदारांनी तिच्या सोबत भांडण झगडा करून तिला शारीरिक व मानसिक त्रास दिलेला आहे. गैरअर्जदारांच्या वागण्यामुळे अर्जदार क्र.1 हिचा शारीरिक व भावनिक छळ झालेला आहे.

**06.** अर्जदार हिचे पुढे असे म्हणणे आहे की, एके दिवशी अर्जदार हिला स्वयंपाक करण्यास उशीर झाला. त्यामुळे, त्या कारणावरून गैरअर्जदारांनी तिला मारहाण केली. त्यानंतर त्यांनी तिच्या वडिलांना फोन करून बोलावून घेतले आणि आम्हाला तुमची मुलगी पाहिजे नाही, तिला आत्ताच्या आत्ता घेऊन जा. असे म्हणून तिला आणि तिच्या वडिलांना शिवीगाळ केली. अर्जदार हिचे वडिलांनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांनी तिच्या वडिलांचे काहीही ऐकले नाही. त्यानंतर त्यांनी अर्जदार हिला आणि तिच्या मुलीला नेसत्य वस्त्रानिशी घराबाहेर हाकलून लावले आहे. त्यामुळे ती नविलाजाणे तिच्या मुलीला (अर्जदार क्र.2 हिला) घेऊन तिच्या माहेरी राहत आहे. ती जेंव्हा पासून माहेरी राहत आहे तेंव्हा पासून गैरअर्जदारांनी तिच्या तसेच तिच्या मुलीच्या (अर्जदार क्र.2 च्या) खाण्यापिण्याची, कपड्यालत्याची आणि दैनंदिन खर्चाची काहीही तरतूद केली नाही. अर्जदार हिची गैरअर्जदाराकडे नांदायला जावयाची इच्छा आहे. परंतु गैरअर्जदार तिला नंदवायला तयार नाही. अर्जदार हिचे वडीलांनी बैठकी घेतल्या परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. अर्जदार हिचे पुढे असे म्हणणे आहे की, तिच्या कडे उत्पन्नाचे काहीही साधन नाही. त्यामुळे तिच्यावर आणि तिच्या मुलीवर उपासमारी ची वेळ आलेली आहे. अर्जदार क्र.2 हीची तब्बेत नेहमी खराब असते. त्यामुळे तिला नेहमी दवाखान्यात न्यावे लागते. आज पर्यन्त अर्जदार क्र.1 हिने दवाखान्याचा अंदाजे रुपये 2,00,000/- खर्च केलेला आहे. अर्जदार हिला उदरनिर्वाह तसेच दवाखान्याचा

खर्च दरमाह रुपये 15,000/- येतो आणि त्याच बरोबर रुपये 5,000/- घर भाडे लागते. त्यामुळे गैरअर्जदारांनी तिला आणि तिच्या मुलीला एकत्रित पोटगी आणि घरभाड्याचे दरमाह रुपये 20,000/- द्यावेत असे गैरअर्जदारांना आदेशीत करावे अशी तिने विनंती केली आहे.

**07.** अर्जदार हिचे पुढे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार क्र.1 याच्याकडे पाण्याची 8 एक्कर शेती आहे. त्यापासून त्याला वर्षाला रुपये 7,00,000/- ते 8,00,000/- उत्पन्न मिळते. गैरअर्जदार यांचे गोरेगाव पंचाल येथे 6 खोल्याचे स्लॅब चे स्वतःचे घर आहे. एकंदरीत गैरअर्जदार यांची अर्थीक परिस्थिति सक्षम आहे. त्यामुळे गैरअर्जदार हे अर्जदार हिने मागणी केल्या प्रमाणे तिला सहज पोटगी देऊ शकतात. प्रकरणाचा निकाल लागण्यासाठी बराच अवधि लागणार आहे. त्यामुळे तिचा अर्ज मंजूर करावा अशी तिने विनंती केली आहे.

**08.** गैरअर्जदारांनी निशाणी क्र.13 वर म्हणणे दाखल केले आहे. करुन अर्जास आक्षेप घेतला आहे. अर्जदार क्र.1 ही त्याची पत्नी आहे आणि अर्जदार क्र.2 ही त्याची मुलगी आहे या बाबी त्याला मान्य आहेत. त्याच बरोबर अर्जदार क्र.1 ही अर्जदार क्र.2 हिला घेऊन तिचे माहेरी राहत आहे हे सुद्धा त्याला मान्य आहे.

**09.** गैरअर्जदारांचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार हिचे पूर्वी लग्न झाले होते. परंतु तिच्या भांडखोर स्वभावामुळे तिचे तिच्या पहिल्या पती सोबत पटत नव्हते. त्यामुळे तिच्या पहिल्या पतीने तिला नोटरीद्वारे फारकत दिली. त्यानंतर अर्जदार हिचे आई वडिलांनी अर्जदार यांना फसवून त्याचे अर्जदार हिचे सोबत लग्न लाऊन दिले. अर्जदार ही गैर अर्जदार ह याला अपमानकारक बोलत असे, त्याच तीने बरोबर गैरअर्जदार क्र.2 ते 4 यांना सुद्धा त्रास दिला. ती घरातील कामे करीत नसे. व स्वयंपाक करीत नसे. त्यामुळे त्याला उपाशी कामाला जावे लागत असे. ती फोन वर दिवस-दिवस बोलत असे. गैरअर्जदार क्र.1 ला वेग वेगळे राहुत म्हणून त्याला त्रास देत असे. त्यामुळे तो तिचे सोबत वेगळे राहू लागला. अर्जदार ही गैरअर्जदार याला

असे म्हणत असे की तो तिला पसंत नाही. ती आत्महत्या करून त्याला जेल मध्ये पाठविण अशी धमकी सुद्धा देत असे. त्याचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार हिने घरात ठेवलेले रुपये 1,00,000/- आणि गैरअर्जदारांनी तिला केलेले सोण्याचे दागिने घेऊन ती माहेरी निघून गेली. दिनांक 21.06.2022 रोजी अर्जदार स्वतः च्या मार्जिणे माहेरी निघून गेली ग तेंव्हा पासून ती माहेरी राहात आहे. गैरअर्जदार याई यांनी तिला परत नांदायला आणण्याचा बऱ्याच प्रयत्न केले परंतु ती अली नाही. गैरअर्जदार क्र.1 व त्याचे आई वडील नातेवाईक अर्जदार हिच्या घरी गेले व तिला नांदायला यावे म्हणून विनंती केली. परंतु अर्जदार हिने व तिच्या आई वाडिलांनी गैरअर्जदार व त्याचे नातेवाईक यांना अश्लील भाषेत शिवीगाळ केली आणि जीवे मारन्याची धमकी दिली. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा कोणताही कौटुंबिक हिंसाचार केला नाही. त्यामुळे अर्जदार हिला प्रस्तुत चे प्रकरण दाखल करणेच अधिकार नाही. अर्ज दाखल करण्यास कोणतेही कारण घडले नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा असे गैरअर्जदार यांचे म्हणणे आहे.

**10.** गैरअर्जदार यांचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार ही धड धाकट आहे. ती दिवसाकाठी मजुरी करून रुपये 200 ते 300 कामविते. या उलट गैर अर्जदार हा मिळेल ते मा कामकरतो आणि त्यामधून त्याला दररोज कसेबसे रुपये 200 ते 300 मिळतात. अर्जदार हिची म्हणण्या प्रमाणे गैरअर्जदार याच्या कडे शेती नाही. किंवा ती म्हणते त्याप्रमाणे त्याची अर्थीक परिस्थिती नाही. त्यामुळे तो अर्जदार हिने मागणी केल्या प्रमाणे पोटगी आणि घरभाडे देऊ शकत नाही. सबब अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**11.** अर्जदारांचे अर्जातील कथन, गैरअर्जदारांचे म्हणणे वाचले. त्याच बरोबर पटलावर दाखल उत्पन्न आणि खर्चाचे विवरणपत्र यांचे अवलोकन केले. गैरअर्जदार यांच्या वतीने दाखल केलेले लेखी युक्तिवाद यांचे अवलोकन केले त्याच बरोबर पटलावर उपलब्ध कागदपत्रे आणि अर्जदारांचे विद्वान विधीज्ञ श्री. डी. पी. मापारी आणि गैरअर्जदारांचे विद्वान विधीज्ञ श्री. आर. जे. निकस यांचा युक्तिवाद या आधारे

जे मुद्दे उपस्थित झाले ते मुद्दे आणि त्या मुद्दयावरील निष्कर्ष आणि अशा निष्कर्षाप्रत येण्यासाठीची कारणमिमांसा पुढील प्रमाणे आहे.

## उपस्थित मुद्दे

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1. | अर्जदार क्र.1 हिने असे सिध्द केले आहे काय की, गैरअर्जदारांनी अर्जदार हिला मुलगी झाली म्हणून तिचा शारीरिक, मानसिक व आर्थिक छळ केला व त्याद्वारे तिचा कौटुंबिक हिंसाचार केला? | .. अंशतः होकारार्थी. |
| 2. | अर्जदार असे सिद्ध करते काय की, गैरअर्जदार क्र.1 याने अर्जदार हिचे तसेच अर्जदार क्र.2 यांच्या उपजीविकेची काहीही तरतूद केली नाही आणि अर्जदार क्र.1 हीच्याकडे तिचा स्वतःचा आणि अर्जदार क्र.2 यांचा उदरनिर्वाह भागविण्यासाठी कोणतेही साधन नाही? | .. होय. |
| 3. | अर्जदार तिने मागणी केल्याप्रमाणे तिच्या स्वतःसाठी आणि अर्जदार क्र.2 साठी गैरअर्जदारांकडून अंतरिम पोटगी म्हणून रुपये 20000/- मिळणेसाठी पात्र आहे काय? | .. अंतिम आदेशा प्रमाणे. |
| 4. | अर्जदार तिच्या स्वतः साठी आणि अर्जदार क्र.2 साठी अंतरिम पोटगी मिळणेसाठी पात्र आहे काय? असल्यास किती? | .. अंतिम आदेशा प्रमाणे. |
| 5. | अंतिम आदेश काय? | .. अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर |

## विचाराधीन मुद्दे

**मान्य बाबी –**

**12.** अर्जदार क्र.1 ही गैरअर्जदार क्र.1 ची पत्नी आहे आणि अर्जदार क्र.2 ही मुलगी आहे आणि अर्जदार क्र.1 ही तिच्या मुलीला (अर्जदार क्र.2) घेऊन तिच्या माहेरी राहते हे सुद्धा त्याला मान्य आहे.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक 1 ते 4 साठी**

**13.** मुद्दा क्र.1 ते 4 एकमेकांशी निगडीत आहेत. त्यामुळे पुराव्याची तसेच कारणमीमांसेची पुनरावृत्ति टाळण्यासाठी सदर मुद्याबाबद एकत्रित चर्चा केली आहे.

**14.** अर्जदार क्र.1 हिने या अर्जाद्वारे अंतरिम पोटगीची मागणी केली आहे. त्यामुळे अर्जाचे स्वरूप पाहता आणि अर्जदार क्र.1 हीची मागणी विचारात घेता, गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.1 हिचा कौटुंबिक छळ केला काय आणि ती पोटगी मिळविणेसाठी पात्र आहे काय हे अगदी प्राथमिक स्वरूपाच्या पुराव्या आधारे ठरविणे गरजेचे आहे.

**15.** अर्जदार क्र.1 ही गैरअर्जदार क्र.1 ची पत्नी आहे आणि अर्जदार क्र.2 ही त्याची मुलगी आहे. अर्जदार क्र.1 ही तिच्या मुलीला घेऊन माहेरी राहत आहे. ही बाब गैरअर्जदारांना मान्य आहे. त्यामुळे, निश्चितच काही तरी कारण असेल, ज्यामुळे ती माहेरी राहत आहे. प्राथमिक निष्कर्ष हे प्राथमिक पुराव्याआधारे काढले असता अर्जदार मुलीला घेऊन माहेरी राहत आहे त्यासाठी निश्चितच काही कारण आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे मुद्दा क्र.1 चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदविले आहे. गैरअर्जदार क्र.1 हा अर्जदार क्र.1 हिचा पती आणि अर्जदार क्र.2 चा पिता आहे. त्यामुळे, त्यांच्या दैनंदिन खर्चासाठी तरतूद करणे ही त्याची कायदेशीर जबाबदारी आहे.

**16.** मूळ अर्ज निकाली निघण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. अर्जदार हिने तिचे उत्पन्न आणि खर्चाचे विवरणपत्र निशाणी क्र.16 वर दाखल केले आहे. त्याद्वारे हे प्रथम दर्शनी हे सिद्ध होते की, अर्जदार ही स्वतःची आणि तिच्या मुलीची उपजीविका भागविण्यासाठी सक्षम नाही. गैरअर्जदार क्र.1 हा अर्जदार क्र.1 हिचा पती आहे आणि अर्जदार क्र.2 चा पिता आहे. त्यामुळे त्यांचे संगोपन आणि पालनपोषण करण्याची त्याची जबाबदारी आहे. गैरअर्जदार हा विवाहित पुरुष आहे त्याच बरोबर तो तरुण आहे. त्यामुळे पत्नी आणि मुलांचा सांभाळ आणि संगोपन करण्याची त्याची कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे मुद्दा क्र.1 चे उत्तर अंशतः होकारार्थी व 2 चे उत्तर होकारार्थी आणि मुद्दा क्र.3 व 4 चे उत्तर येणे प्रमाणे नोंदविले आहे.

**17.** अर्जदारांनी या अर्जाद्वारे अर्जदार क्र.1 हिला उदरनिर्वाहसाठी व दवाखाण्यासाठी व घरभाडयासाठी एकत्रितरित्या दरमाह रुपये 15,000/– अंतरिम पोटगीची मागणी केली आहे. अर्जदार व गैरअर्जदारांचे राहण्याचे ठिकाण, तेथील सामाजिक संरचना, त्यांच्या गरजा, महागाई, वस्तूंचे दर, इत्यादि बाबींचा विचार करता अर्जदार क्र.1 व 2 यांना दैनंदिन गरजेसाठी, उपजीविकेसाठी तसेच घरभाडेसाठी दरमाह अंदाजे रुपये 5,000/– ते 6,000/– खर्च होत असेल असे निष्कर्ष निघतात.

**मुद्दा क्र.5 साठी**

**18.** गैरअर्जदार क्र.1 हा अर्जदार क्र.1 हिचा पती आहे आणि अर्जदार क्र.2 चा पिता आहे. त्यामुळे त्याची ही जबाबदारी आहे की, त्याने त्यांच्या पालन पोषण आणि संगोपन या साठी लागणार खर्च द्यावा. गैरअर्जदार क्र.2 ते 5 वर ती जबाबदारी टाकता येणार नाही.

**19.** प्रस्तुतचा अर्ज हा अंतरिम पोटगी मिळविणेसाठी दाखल केलेला आहे. हा अर्ज निकाली काढण्यासाठी निव्वळ प्रथम दर्शनी पुराव्याचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे, अर्जाचे स्वरूप आणि मुद्दा क्र.1 ते 4 यांचे निष्कर्षाप्रत येण्यासाठीची कारण मीमांसा विचारात घेऊन मुद्दा क्र.5 च्या उत्तरार्थ पुढील आदेश पारित केले आहेत.

## आदेश

| | |
|---|---|
| (1) | अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| (2) | गैरअर्जदार क्र.1 ने अर्जदार क्र. 01 हिला दरमहा रु.3500/- (रुपये तीन हजार पाचशे) आणि अर्जदार क्र. 02 ला रु.2200/- (रुपये दोन हजार दोनशे) अर्ज दाखल तारखेपासुन द्यावेत. |
| (3) | अर्जदार क्र.2 ही आज रोजी अर्जदार क्र.1 हिच्या सोबत राहत आहे हे स्पष्ट होते. |
| (4) | अर्जदार क्र.1 हिला सदर आदेशाची प्रत विनामूल्य देण्यात यावी. |
| (5) | गैरअर्जदार क्र.1 ते 5 यांना असे निर्देश देण्यात येतात की, त्यांनी अर्जदार यांच्या प्रती कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार करू नये. |
| (6) | आदेशाची प्रत संबंधित पोलिस स्टेशन आणि संरक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी. |
| (खुल्या न्यायालयात अधिघोषीत) | |

दिनांक.24.04.2026

स्वा/-
(रमाकांत भा. हनवते)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लोणार.